# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६०६/२०१६/३७

**(नोदंणी क्रमांक २०१६१२००२२)**

| | | |
|---|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- | ०७.१२.२०१६ |
| निकाल | दिनांक :- | ०७.०२.२०१७ |

श्री. हन्सासिंग बी. गिल, — तक्रारदार
प्लॉट नं. १०४/१०५,
नारेगांव,
औरंगाबाद ४३१ ००५.
(ग्राहक क्रमांक ४९०५८०२७९१९५)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

श्री. हन्सासिंग बी. गिल, प्लॉट नं. १०४/१०५, नारेगांव, औरंगाबाद हे अर्जदार असून ते गैरअर्जदार कार्यकारी अभियंता, (नोडल ऑफिसर), महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९०५८०२७९१९५ असा आहे. अर्जदाराने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ प्रमाणे गैरअर्जदाराविरुध्द तक्रार दाखल केली आहे. तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अर्जदाराने त्यांचे डिसेंबर २०१५ चे विद्युत बीलासंबंधी तक्रार दाखल केली आहे. ग्राहकाचे विद्युत मिटरवरील रिडींग (सुरुवातीचे) ७५५ आणि सध्याचे रिडींग ७५६१ असे आहे. दोन्ही रिडींगमधील फरक ६८०६ युनिट्स इतका आहे व विद्युत बिलाची रक्कम रुपये ४७८७०/- अशी आहे. बिलावर नोंदविण्यात आलेला मिटर क्रमांक G -0042292 असा आहे. परंतु स्थळ पाहणी अहवालानुसार मीटर क्रमांक MD – 190098 हा आस्तित्वात आहे. अस्तित्वात नसलेल्या मीटर क्रमांकावरील रिडींग ही चुकीने दाखविण्यात आली आहे. त्यामुळे ४७८७०/- रुपये आकारण्यात आलेले डिसेंबर २०१५ चे वीजबील सुधारीत करुन द्यावे व सदर बिलावरील व्याज व दंड माफ करण्यात यावा.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

कार्यकारी अभियंता यांचे प्रतिनिधी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, शहर उपविभाग चिकलठाणा, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ११-०१-२०१७ चे पत्रानुसार आपले म्हणणे मांडले आहे.

१) सदरील ग्राहकास डिसेंबर २०१५ मध्ये एकुण ६८०६ युनिटचे वीज बील देण्यात आले. होते.सदरील ग्राहकाने दिनांक १२.०३.२०१६ रोजी चिकलठाणा उपविभागाकडे वीज बील जास्त येत असल्याची तक्रार केलेली होती.

२) सहाय्यक अभियंता यांच्या दिनांक २९.०४.२०१६ च्या स्थळ तपासणी अहवालानुसार ग्राहकाच्या सध्या आस्तित्वात असलेल्या मिटर क्रमांक १९००९८ ची सध्याची रिडींग ७९४७ अशी कळविली आहे.

३) ग्राहकाच्या सीपीएल ची तपासणी केली असता असे आढळुन आले की, माहे ऑक्टोबर २०१४ मध्ये मीटर क्रमांक १९००९८ ची अंतिम रिडींग ६६२९ पर्यंत वीज बील देण्यात आलेले होते व माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये जूने मिटर बदलुन नवीन मीटर क्रमांक ४२२९२ असे बदलुन देण्यात आले. परंतु त्यावेळी औरंगाबाद येथे जीटीएल कंपनी काम पाहात असल्या कारणामुळे सदरील मीटर बदली अहवालाची प्रत या कार्यालयास उपलब्ध नाही.

४) तसेच माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये नवीन मिटरच्या वीज वापरानुसार ६५८ युनिटचे विजबील ग्राहकास देण्यात आलेले आहे. त्यानंतर माहे जानेवारी २०१५ मध्ये ९७ युनिटचे वीज बील देण्यात आलेले आहे व ग्राहकाने दिनांक २१.०४.२०१५ मध्ये वीज बिलाचा भरणा केलेला आहे. माहे फेब्रुवारी २०१५ ते माहे नोव्हेंबर २०१५ या काळात ग्राहकास शुन्य युनिटचे बील देण्यात आलेले आहे.

५) परंतु ग्राहकाने दिनांक १२.०३.२०१६ रोजी चिकलठाणा विभागाकडे वीज बील जास्त येत असल्याची तक्रार केली होती. त्यानुसार सहाय्यक अभियंता यांनी दिनांक २९.०४.२०१६ च्या मीटर स्थळ तपासणी अहवालानुसार १९००९८ ची रिडींग ७९४७ असे कळविले आहे. त्यामुळे वरील काळात ग्राहकाकडे कोणते मीटर होते हे संशयास्पद आहे.

६) सदरील ग्राहकाने विजबील चुकीचे देण्यात आल्याची तक्रार अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांचेकडे केली असता कक्षाने दिलेल्या आदेशानुसार ग्राहकास माहे फेब्रुवारी २०१५ ते नोव्हेंबर २०१५ या काळात कोणते मीटर ग्राहकाकडे होते हे संशयास्पद असल्याने ग्राहकाचे स्थळ तपासणी अहवालानुसार ग्राहकाचा जोडभार १.४ केडब्ल्यु असल्यामुळे त्यानुसार सरासरी प्रति दिवस सहा तास असे २४ दिवस वीज वापर केला असता २०१ युनिट प्रतिमाह वापर येतो. त्यानुसार २०१ युनिट प्रतिमाह त्यानुसार २०० युनिट माहे ऑक्टोबर २०१४ ते डिसेंबर २०१५ या काळात देण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार ग्राहकास देण्यात आलेल्या माहे डिसेंबर २०१५ चे वीज देयक रुपये ४७८७३.४८ पैकी रुपये ३०००२.०० कमी करुन देण्यात आलेले आहेत. सदरील ग्राहकाच्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले असल्यामुळे ग्राहकाची तक्रार खारीज करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे  निष्कर्ष</u>**

१) अर्जदार हन्सासिंग बी. गिल हे गैरअर्जदार महावितरण यांचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. ४९०५८०२७९१९५ असा आहे.

२) ग्राहकास डिसेंबर २०१५ मध्ये ६८०६ युनिटचे विजबील देण्यात आले होते.  सदर विजबील जास्त असल्याची सदर ग्राहकाने दिनांक १२.०३.२०१६ रोजी चिकलठाणा उपविभागाकडे तक्रार केली होती.

३) ग्राहकास CPL मध्ये नोव्हेंबर २०१४ मध्ये जुने मीटर क्र. १९००९८ ऐवजी त्या जागी नवीन मीटर क्रमांक ४२२९२ अन्वये बिलींग करण्यात आली.  ज्याअर्थी, सदर मीटर बदलल्याचे कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नाही व महावितरणने स्थळ तपासणी केली असता त्या जागी मीटर क्रमांक १९००९८ आस्तित्वात असल्याचे आढळले, त्याअर्थी त्या ठिकाणी मिटर बदलविण्यात आलेले नाही असे निदर्शनास येते.

४) ग्राहकाकडे नक्की कोणते मीटर होते हे संशयास्पद असल्यामुळे ग्राहकास सरासरी प्रमाणे दरमहा २०१ युनिटचे विजबील माहे ऑक्टोबर २०१४ ते डिसेंबर २०१५ या काळात देण्याचे आदेश दिनांक २५.०८.२०१६ ला  अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने दिले.  त्यामुळे डिसेंबर २०१५ या महिन्याचे वीज बीलात ३०००२/- रुपये कमी करुन देण्यात आले आहेत ते योग्य वाटत नाही.

५) स्थळ तपासणी अहवालाचे अवलोकन केले असता त्यात कामाचे सर्व साधारण २ तास, एकुण वीज भार १.४ कि. वॅट व मीटरची स्थिती सुरळीत/ चांगली असल्याची नोंद केली आहे व सदरचे मीटर नादुरुस्त अथवा संशयास्पद असल्याचे नमुद केलेले नाही.

६) CPL चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, ज्याअर्थी माहे एप्रिल २०१४ मध्ये मीटर क्रमांक १९००९८ चे मागील वाचन ४७३६ व चालु वाचन ५४३२ असे ६९८ युनिटचे विजबील देण्यात आले.  त्यानंतर माहे मे, जून, जुलै २०१४ चा वीज बिलाचा तपशिल उपलब्ध नसून ऑगस्ट २०१४ मध्ये ६६२९ युनीट पर्यंतचे वीज बिल

आकारण्यात आले. डिसेंबर २०१५ मध्ये मागील वाचन ७५५ व चालु वाचन ७५६१ असे दर्शविले आहे व वास्तविकता मीटर बदली केलेले नसून जूनेच मीटर क्रमांक १९००९८ आस्तित्वात आहे, त्या अर्थी, सदरचे कालावधीत फक्त ९३२ (७५६१-६६२९) युनिटचा वीज वापर झाला असल्याने तसे वीज बिल ग्राहकास देणे क्रमप्राप्त आहे.

वरील प्रमाणे अर्जदार, गैरअर्जदार यांनी सादर केलेले आपले म्हणणे व ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच यांनी काढलेले निष्कर्ष यावरुन मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचा दिनांक २५.०८.२०१६ चा आदेश रद्द करण्यात येत आहे.

२) मिटर क्रमांक MS 190098 हे स्थळावर उपलब्ध असून सुस्थितीत असल्याने त्यावरील मिटर रिडींग प्रमाणेच विजबील देण्यात यावे.

३) कोणताही खर्च किंवा दंड नाही.

४) मीटर रिडींग घेणाऱ्या संस्थेवर अचुक मीटर रिडींग न घेतल्यामुळे कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

५) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |